पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

-: प्रेस नोट :- **दि. ३१/१०/२०२६**

३६ वर्षापासून फरार असलेल्या स्थायी अजामीनपात्र वॉरन्ट मधील आरोपीस वडोदरा, राज्य-गुजरात येथून गुन्हे शाखेकडून अटक केलेबाबत.

फिर्यादी पुरुष वय २९ वर्षे हे त्यांचे दुकानातील हिरे, सोन्याचे दागिने व रोख रक्कम पोहचवण्यासाठी जात असताना पंचरत्न बिल्डिंगच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर ०४ अज्ञात इसमांनी संगनमताने त्यांना रिव्हॉल्वर व चॉपरचा धाक दाखवून त्यांना दुखापत करुन त्यांचेकडील हिरे, दागिने व रोख रक्कम अंदाजे किंमत २०,४८,९६४/- रुपये जबरी चोरी केल्याने डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा पुढील तपास गुन्हे शाखा, कक्ष-२ कडून करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर गुन्हयातील आरोपी पुरुष वय ५९ वर्षे हा नमूद केसच्या सुनावणी दरम्यान मा. न्यायालयात वारंवार गैरहजर राहत असल्याने मा. न्यायालयाने त्याचे विरुध्द स्थायी अजामीनपात्र वॉरन्ट काढले होते. सदरचे वॉरन्ट बजावणीकरीता गुन्हे शाखा, कक्ष-२ कार्यालयास देण्यात आले होते.

नमूद स्थायी अजामीनपात्र वॉरन्ट मधील आरोपी पुरुष वय ५९ वर्षे याचेबाबत पोलीस पथकाने प्रत्यक्ष माहिती गोळा करुन व तांत्रिक विश्लेषणाव्दारे त्याचा शोध घेवून त्यास दि. ३०/१०/२०२६ रोजी गांव-पोर, जिल्हा-वडोदरा, राज्य-गुजरात येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहायक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण श्री. पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ येथील प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप तेजनकर, पो.उ.नि. संकल्प मोकल, सफौ सावंत, पोशि घरत, पोशि सिंह, पोशि आव्हाड, मपोशि प्रियंका क्षिरसागर यांनी केलेली आहे.